**प्रेस नोट २३/०८/२०१९**

**येरवडा परिसरात २९,२४,६५० रोख रक्कम चोरुन नेणाऱ्या दरोडेखोरांना येरवडा पोलीसांकडुन अटक एकुण ११,१०,०००/- रुपायांचा मुददेमाल जप्त-**

दिनांक १०/०८/२०१९ रोजी यातील फिर्यादी नामे विठठल श्रीनिवासराव करजगीकर हे त्यांचे मालकांने दिलेली रोख रक्कम घेवुन मुंबई कडे जात असताना ते पर्पल बसमधुन उतरुन येरवडा मशिदचे शेजारी बाजुचे मोकळे जागेत लघुशंका करण्यासाठी गेले तेथे लघुशंका करीत असताना अनोळखी चोरटा फिर्यादीचे मागुन येवुन त्यांचे ताब्यातील सॅक बॅग हिसकावुन रोख रकमेसह फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने चोरुन घेवुन गेला आहे. वैगरे वरुन येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.५५७/२०१९ भा.द.वि.क.३९५,१२० ब प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान येरवडा पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोकॉ/नागलोत,परदेशी,भोरडे यांनी घटनास्थळावरील मिळालेल्या पुराव्याच्या आधारे तसेच त्यांना त्यांचे गोपनिय बातमीदारकडुन बातमी मिळाली की, दिनांक २२/०८/१९ रोजी संगमवाडी पार्कींग येथे लातुर कडे जाणेरे ठिकाणी लक्झरी स्टॅंड वर नमुद गुन्हयातील आरोपी नामे सुमित पाटील व राहुल सुर्यवशी हे त्यांचे ताब्यातील टि व्ही एस ज्युपिटरवर येणार असुन ते गावी पळुन जाणाच्या तयारीत आहेत. सदर बातमीच्या अनुषंगाने संगमवाडी येथील पार्कीग मध्ये सापळा लावुन येरवडा तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक भांगे, पोना/गवळी,कुदळे,मोहीते,कारखेले,सरोदे,नागलोत,परदेशी,भोरडे यांनी आरोपी नामे **१) सुमीत बालाजी पाटील वय १९ वर्षे रा.हनुमान नगर सिग्नल नंबर-२, तालुका उदगिर जि लातुर, २) राहुल देवीदास सुर्यवंशी वय २० वर्षे रा.मु.पो.घोणशी ता.जळकोट, जि लातुर यांना** ताब्यात घेवुन त्यांचे कडे केले तपासात खालील प्रमाणे हकीकत निदर्शनास आली आहे.

सदर गुन्हयातील आरोपी नामे **गजानन ऊर्फ पिंटु पांडुरंग सुवर्णकार वय ३० वर्षे रा.मु.पो.गुरदाळ ता देवणी जि लातुर** हा पुर्वी फिर्यादी यांचे मालक यांचे कडे फिर्यादीप्रमाणेच कामास होता. काही महीन्यापुर्वी त्याचा अपघात झाल्याने त्याने सदर काम सोडुन दिले होते. त्यामुळे त्यास नांदेड येथील ऑफीस चे कामाची तसेच त्यांचे पैसे केंव्हा व कोठे जातात याबाबत सविस्तर माहीती होती. त्याचा उपयोग करुन याने **१) संदीप तानाजी बिरादार वय २२ वर्षे रा. मुळंगाव नाईक चौक उदगिर जि लातुर २) मंगेश रमेश बिरादार वय २८ वर्षे रा. मुळंगाव आंबेडकर चौक लोहारा ता उदगिर लातुर ३) सुमीत बालाजी पाटील वय १९ वर्षे रा.हनुमान नगर सिग्नल नंबर-२, तालुका उदगिर जि लातुर, ४) राहुल देवीदास सुर्यवंशी वय २० वर्षे रा.मु.पो.घोणशी ता.जळकोट, जि लातुर यांना** व पाहीजे आरोपी संभाजी कुटगावे यांना एकत्र करुन त्यांचे सोबत पैसे लुटण्याचा कट रचुन सदर ठरल्याप्रमाणे सदर आरोपी पैकी आरोपी सुमित पाटील हा पुण्यात राहणारा असल्याने त्याने सदर गुन्हा करण्याकरीता त्याची मोपेड गाडी वापरण्याचे ठरविले व राहुल सुर्यवंशी याने बॅग चोरुन आणण्याचे तसेच इतर आरोपी यांनी घटनास्थळी दबा धरुन थांबुन काही अडचण आल्यास मध्ये येवुन त्यांचे साथीदारांना सोडविण्याचे ठरविले.

दिनांक १०/०८/१९ रोजी सकाळी ०६.३० वा.वरील सर्व आरोपी हे नियोजित कटाप्रमाणे येवुन त्यांनी दाखल गुन्हा केला असुन गुन्हा केल्यानंतर त्यांनी सदर गुन्हयातील रोख रकमेची वाटणी केली आहे.

सदर आरोपींकडुन येरवडा तपास पथकाने आता पर्यंत एकुण **१०,५०,०००/-रोख रक्कम व गुन्हा करणेसाठी वापरलेली ज्युपिटर गाडी असा एकुण ११,१०,०००/-रु. किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत केलेला आहे. सदर आरोपींना मा.कोर्टात हजर केले असुन त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली आहे. उर्वरित रक्कम व पाहीजे आरोपीचा शोध घेणे चालु आहे.

**सदर कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री सुनिल फुलारी, मा.पोलीस उप आयुक्त श्री प्रसाद अक्कानवरु, मा.सपोआ येरवडा विभाग.श्री रामचंद्र देसाई,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनुस शेख येरवडा, पोनि (गुन्हे) अजय वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, सपोफौ/बाळु बहीरट, पोहवा/हणमंत जाधव, पोहवा/संदिप मांजुळकर, पोना/पंकज मुसळे, पोना/अशोक गवळी, पोना/मनोज कुदळे, पोना/मोहीते,पोना/कारखेले पोशि/समीर भोरडे, पोशि/राहुल परदेशी, पोशि/सकट, पोशि/सुनिल नागलोत, पोशि/विष्णु सरोदे, पोना/ कुंवर, पोशि/ पाडोळ यांनी केलेली आहे.

NShaikh

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन


येरवडा पोलीस स्टेशन (पुणे शहर)


COPS EXCELLENCE
येरवडा पोलीस स्टेशन (पुणे शहर)